# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सार्वत्रिक निवडणुक-2017

## निवडणूक संदर्भात संक्षिप्त टिप्पणी

- प्रभाग रचना :-

नांदेड वाघाळा शहर महानरगपालिका, नांदेड सार्वत्रिक निवडणूक 2017 साठी मा. राज्य निवडणुक आयोगाने दि.14.08.2017 रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केली आहे.

- मतदार यादी :-

प्रभाग रचना प्रसिध्दी नंतर दुसरा टप्पा मतदार यादीचा आहे. दि. 01.07.2017 रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादी वरून मतदार यादी तयार करणे व प्रसिध्द करणेचा कार्यक्रम मा.राज्य निवडणुक आयोगाने निच्शित करून दिलेला आहे. या निवडणूकीत प्रथमच True Voter Mobile Application द्वारे प्रभागात समक्ष फिरून वसूली लिपीकामार्फत संपुर्ण 20 प्रभागाची मतदार यादी तयार करून, प्रारूप मतदार यादी दि. 19.08.2017 रोजी प्रसिध्द करण्यात आली. या प्रारुप यादीवर आक्षेप व हरकती दि. 19.08.17 ते 28.08.2017 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत 4 क्षेत्रिय कार्यालयात एकूण 62 आक्षेप ेअर्ज प्राप्त झाले. सदर आक्षेप संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत तपासणी करून अंतिम मतदार यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर मतदार यादी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 7 अ मधील तरतुदीनुसार दि. 09.09.2017 रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच त्यानंतर मतदान केंद्र निहाय मतदार यादी अधिप्रमाणित करून प्रसिध्द करण्यात येणार आहे.

- मतदान केंद्र निश्चित करणे :-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी 20 प्रभागाकरीता मा. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक मतदान केंद्रात 750 ते 800 मतदारांप्रमाणे मतदानाकरीता मतदान केंद्रे निश्चित करण्यात आलेली आहेत. एकुण 575 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.यात शासकिय कार्यालय/शाळा, मनपा शाळा व खाजगी शाळा ईत्यादी मध्ये मतदान केंद्रे ठेवण्यात आलेली आहेत. एका प्रभागात सरासरी 25 ते 30 मतदान केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. सर्व मतदान केंद्रे हे इमारतीच्या तळमजल्यावर प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी रॅम्पची व्यवस्था करण्यात येणार आहे.

- VVPAT यंत्राचा वापर:-

मा.राज्य निवडणुक आयोगाने VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trail) प्रथमच वापर करण्याचा माणस आहे. त्यानुषंगाने ECIL Company Hyderabad व राज्य निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधी मार्फत महानगरपालिकेत दिनांक 28.08.2017 व 29.08.2017 रोजी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणास महानगरपालिकेचे उप अभियंता, सर्व सहाय्यक आयुक्त व इतर कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेतले. सदर यंत्रात मतदारांना कोणास मतदान केले याची जानीव होणार आहे. त्यामुळे मतदान प्रक्रियेत पारदर्शकता निमार्ण होईल. सदर निवडणुकीत VVPAT यंत्राचा वापर आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यास दोन निवडणूक निर्णय अधिका-यांच्या क्षेत्रात जवळपास 235 मतदान केंद्रावर प्रायोगिक तत्वावर वापर करण्याचा मानस आहे.परंतू या बाबत सध्या अंतीम मंजुरी प्राप्त नाही.

➢ निवडणूक निर्णय अधिकारी /सहा.निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या :-

मा.राज्य निवडणुक आयोगाच्या आदेश नुसार महानगरपालिकेसाठी साधारणत: 3 ते 4 प्रभागाकरीता 1 याप्रमाणे निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्ती करण्यास निर्देश दिलेले आहेत. सदरील निवडणुक निर्णय अधिकारी हे उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकारी यांची नियुक्ती मा. विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यास आदेशात नमुद केलेले आहे.

तसेच सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी क्रं. 1 म्हणून तहसिलदार संवर्गातील अधिकारी नियुक्ती करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी क्रं. 2 हा अधिकारी मनपाचा प्रभाग अधिकारी अथवा सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकारी असेल. सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी क्रं. 3 हा महानगरपालिकेच्या उप अभियंता अथवा सहाय्यक आयुक्त दर्जाच्या अधिकारी असेल.

मनपा सार्वत्रिक निवडणूक-2017 साठी मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडुन 8 उपजिल्हाधिकारी व 7 तहसिलदार यांच्या नांवांची शिफारस करण्यात आली असून त्यानुसार निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदर अधिका-यांचे मदतीसाठी महानगरपालिकेतील सहा. आयुक्त व उप अभियंता यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

➢ मतदान कर्मचारी (Polling Staff) :-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता एकूण 20 प्रभागासाठी खालील प्रमाणे प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान केंद्राध्यक्ष, तिन मतदान अधिकारी व एक शिपाई यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच मुस्लिम बहुसंख्य मतदान केंद्रावर 1 महिला देणे आवश्यक आहे. ज्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. सदर लागणा-या कर्मचा-यांची माहिती शासकीय/ निमशासकीय कार्यालय,शाळा, खाजगी शाळा, महाविद्यालय यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात आली आहे.

| मतदान केंद्राची संख्या | केंद्राध्यक्ष | मतदान अधिकारी | चतुर्थ श्रेणी कर्मचारी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 575 | 575 | 1725 | 575 | 2875 |
| राखीव | 60 | 175 | 60 | 0295 |
| एकुण :- | 635 | 1900 | 635 | 3170 |

➢ झोनल ऑफिसर :-

सदर निवडणुकीस एकूण तसेच एका प्रभागासाठी 1 या प्रमाणे राखीवसह एकुण 30 क्षेत्रिय अधिकारी (झोनल ऑफीसर) नियुक्ती करण्यात येणार आहे.

➢ <u>प्रशिक्षण (Training) :-</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणूकीसाठी 7 निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असुन मतदान केंद्रावरील नियुक्त कर्मचा-यांना त्यांच्यामार्फत निश्चित केलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय अथवा सभागृहात प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे.

➢ <u>निवडणूक संनियंत्रण समिती :-</u>

मा.राज्य निवडणुक आयोगाकडून आदेश दि. 21.07.2017 अन्वये महापालिकेच्या निवडणुकीसाठी आचार सहिंतेची अमलबजावणी प्रभावीपणे करणे, उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व कायदा सुव्यवस्था राखणे यासाठी निवडणूक संनियंत्रण समिती महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षते खाली नियुक्ती करण्यास निर्देश मा.राज्य निवडणुक आयोगाने दिल्यानुसार विविध विभागांचे अधिका-यांची खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | समितीतील अधिकारी / सदस्यांची नांवे | पदनाम | संनियंत्रण समितीतील पदनाम | विभाग |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. गणेश देशमुख | आयुक्त तथा निवडणूक अधिकारी | अध्यक्ष | महापालिका नांदेड |
| 2 | श्री. चंद्रकिशोर मीना | जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य | पोलीस विभाग, नांदेड |
| 3 | श्री. एस.बी. शेंडगे | सहाय्यक आयुक्त | सदस्य | आयकर विभाग, नांदेड |
| 4 | श्री. पी.एस. गोपनवार | सहाय्यक आयुक्त | सदस्य | विक्रीकर विभाग, नांदेड |
| 5 | श्री. के.जी.राऊत | अधिक्षक | सदस्य | राज्य उत्पादन शुल्क विभाग, नांदेड |
| 6 | श्री. राजेंद्र एस. पत्की | रिजनल मॅनेजर | सदस्य | रिजनल ऑफीस, एस.बी.आय. बँक, इंडस्ट्रीयल एरिया, नांदेड |
| 7 | श्री. एस.जी. शेलार | अधिक्षक अभियंता | सदस्य | सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड |
| 8 | श्री. विजय किरणकर | सह. प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य | प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) नांदेड |
| 9 | श्री. आर. आर. कांबळे | अधिक्षक अभियंता | सदस्य | महाराज्य राज्य विद्यूत महावितरण लि., नांदेड |
| 10 | श्री. संतोष कंदेवार | उप आयुक्त (निवडणूक) | सदस्य सचिव | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |

- <u>आचारसंहिता ( Code of Conduct) :-</u>

मा.राज्य निवडणूक आयोगाने महापालिका सार्वत्रिक निवडणूकी करीता आदर्श आचार संहिता लागु केलेल्या दिनांकापासुन ती निवडणुक प्रक्रिया संपेपर्यंत अमलात राहणार आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रीया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी राज्य निवडणुक आयोगाच्या सुधारीत आदेश दि. 14 ऑक्टोबर 2016 व वेळोवेळी सुधारीत केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आचारसंहितेच्या अमंबजावणीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी निहाय सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी यांना सहाय्यक म्हणुन आचारसंहितेची कामे सोपविण्यात येणार आहेत.

आचारसंहितेचे अंमलबजावणी प्रभावीपणे राबविण्यासाठी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक व शहरातील (06) पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षकांची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे समवेत घेण्यात येणार आहे. तसेच विविध राजकीय पक्षांच्या पदाधिका-यांची देखील बैठक घेण्यात येणार आहे. आचारसंहितेच्या कालावधीत राजकीय पक्ष व उमेदवारांनी **काय करावे ? व काय करू नये ?** याबाबत आयोगाचे निर्देशाची प्रत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

- <u>व्हिडीओ ग्राफी सर्व्हीलियन्स पथक (Video Surveillance Team) :-</u>

मा.राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता जाहिर केल्यापासून महापालिका क्षेत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील आचारसंहिता पथकात तसेच मागणीनूसार सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत अंमलबजावणी करण्यासाठी व्हिडीओ ग्राफी सर्व्हीलियन्स पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

- <u>मिडीया सेंटर :-</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक 2017 साठी नागरीकांना / पत्रकारांना दररोजची अद्यावत माहिती उपलबध होण्याच्य दृष्टीने महापालिकेच्या स्टेडियम परिसरातील इमारतीत मिडीया सेंटर स्थापन करण्यात येणार असून तेथून सर्व माहिती उपलबध करुन देण्यात येणार आहे.

- <u>भरारी पथक (Flying Squad) व चेक पोस्ट साठी पथक (SST):-</u>

निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक तैनात करण्यात येणार आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील म्हत्वाचे नाके इत्यादी येथून मद्य/शस्त्रांची अवैध वाहतूक होउ नये यासाठी पोलीस व अन्य अधिका-यांची नियुक्ती करून चेकपोस्ट तयार करून SST पथक नेमण्यात येणार आहे.

➢ <u>निवडणुक निर्णय अधिकारी यांचे निवडणुक कार्यालय व मत मोजणीसाठी प्रस्तावित ठिकाण :-</u>

| अ. क्र. | निवडाणुक निर्णय अधिकारी यांचे नाव व पदनाम | सहा.निवडणुक निर्णय अधिकारी क्र-01 | सहा.निवडणुक निर्णय अधिकारी क्र-02 | सहा.निवडणुक निर्णय अधिकारी क्र-03 | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री संजय कुंडेटकर, उपजिल्हाधिकारी (साप्र) जि.अ.कार्यालय,परभणी | श्री ए.पी.त्रिभुवन, तहसिलदार,आकृतीबंध जि.अ.नांदेड | श्री संजय जाधव, क्षेत्रिय अधिकारी | श्री दिलीप टाकळीकर, उपअभियंता, मनपा | आदीवासी चालक सभागृह, एस टि महामंडळ कार्यालय, वर्कशॉपरोड नांदेड |
| २ | श्री सुदर्शन गायकवाड उपजिल्हाधिकारी (रोहयो) जि.अ.का.परभणी | श्री अरविंद नरसीकर, तहसिलदार,अर्धापुर जि.नांदेड | श्री शिवाजी डहाळे, क्रिकेट कोच,मनपा | श्री सुनिल देशमुख, उपअभियंता,मनपा | जुने क्षेत्रिय कार्यालय, गणेशनगर,पाण्याचे टाकी जवळ,नांदेड |
| ३ | श्री संतोष वेणीकर, जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.अ.कार्यालय,नांदेड | श्रीमती संतोषी देवकुळे, सहा.जि.पु.अ. जि.अ.कार्यालय,नांदेड | श्रीमती माधवी मारकड, सहा.आयुक्त | श्री प्रकाश कांबळे, उपअभियंता,बिएसयुपी | क्षेत्रिय कार्यालय क्र-ब श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम परिसर, नांदेड |
| ४ | श्री महेश वडदकर, जिल्हापुनर्वसन अधिकारी, जि.अ.कार्यालय नांदेड | श्री किरण अंबेकर, तहसिलदार, नांदेड | श्री फरहतुल्लाह बेग, उद्यान अधिक्षक | श्री शिवाजी बाबरे, उपअभियंता,सा.बा. | कापुस संशोधन केंद्र हैद्राबाद रोड, देगलूर नाका नांदेड |
| ५ | श्री प्रदिप कुलकर्णी, उपविभागिय अधिकारी,नांदेड | श्रीमती सुरेखा स्वामी, परि.तह. तहसिलदार,उमरी,जि, नांदेड | श्री सुधीर इंगोले, क्षेत्रिय अधिकारी | श्री दिलीप आरसुडे, उपअभियंता, | महाराजा रणजितसिंघज मार्केट, क्षेत्रिय कार्यालय, पहिला मजला जुना मोंढा नांदेड |
| ६ | श्रीमती दिपाली मोतीयाळे, उप विभागिय अधिकारी, भोकर,जि.नांदेड | श्री सुरेश प्रल्हाद घोळवे, तहसिलदार,मुखेड जि.नांदेड | श्री तानाजी कानोटे, प्र.सहा.आयुकत | श्री मनोहर दंडे, उपअभियंता,सा.बा. | स्थानिक संस्था कर कार्यालय,मनपा,गांधी पुतळा पाण्याची टाकी जवळ,वजिराबाद |
| ७ | श्री एस.डी.महिंद्रकर, वि.भुसंपादन अधिकारी, लसिका नांदेड | श्रीमती उज्वला पांगारकर, महसुल सहाय्यक, जि.अ.कार्यालय,नांदेड | श्री अविनाश अटकोरे, क्षेत्रिय अधिकारी | श्री नरेंद्र सुजलेगांवकर उपअभियंता,सा.बा. | साई मंगल कार्यालय, हडको बस स्टॉप जवळ, हडको. |